ISSN-2278-5655

AMIERJ

AARHAT MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL EDUCATION RESEARCH JOURNAL

Volume–X, Issues– II Jan –Feb 2021

संत महात्मा बसवेश्वर यांचे कौशल्य विकास व श्रमप्रतिष्ठा यासंदर्भातील विचार: एक अभ्यास

डॉ.व्यंकटराव का. कदम
एम.ए.(हिंदी)पीएच.डी.(शि) सहाय्यक प्राध्यापक
वसंतराव नाईक अध्यापक महाविद्यालय शिरूर(ता)
ता.अहमदपूर जि. लातूर.

उमाकांत शि. चलवदे
एम. एस्सी. एम.एड. सेट (शिक्षण शास्त्र)
सहशिक्षक जगत जागृती विद्यालय चाकूर.
ता. चाकूर जि. लातूर

प्रास्ताविक:

औद्योगिक विकास ही अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी आवश्यक आहे. यासाठी कुशल कामगारांची आवश्यकता असते. औद्योगिक क्षेत्रांमध्ये कुशल कामगारांची आवश्यकता आणि पुरवठा यामधील पोकळी भरून काढण्यासाठी केंद्र सरकारने कौशल्य विकास कार्यक्रम हाती घेतला आहे.हा कार्यक्रम लोकसहभाग आणि खाजगी क्षेत्राच्या भागीदारीतून पूर्ण करावयाचा आहे.भारताच्या अर्थमंत्री माननीय निर्मला सीतारमण यांच्यावर संत महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांचा मोठा प्रभाव आहे.त्यांनी अर्थसंकल्प सादर करताना संत महात्मा बसवेश्वरांच्या शिकवणीचा उल्लेख केला आहे.त्यांनी महात्मा बसवेश्वरांच्या "कायक वे कैलास" सिद्धांत व"दासोह"सिद्धांताचा उल्लेख केला आहे. "कायक वे कैलास" म्हणजे श्रम हीच पूजा आहे व दासोह म्हणजे समाजाला देने.त्यांच्यामते प्रधानमंत्री कौशल विकास योजना ही महात्मा बसवेश्वर यांच्या विचारावरच आधारित आहे. प्रस्तुत संशोधनात आपण संत महात्मा बसवेश्वरांच्या श्रमप्रतिष्ठा व कौशल्य विकास या कार्याचा विचार करणार आहोत.

Aarhat Publication & Aarhat Journals is licensed Based on a work at *http://www.aarhat.com/amierj/*

"कायक वे कैलास" सिद्धांत:

समाजात निर्माण झालेली विषमताही आर्थिकतेतून निर्माण होते. समाजाला समान पातळीवर आणण्यासाठी संत महात्मा बसवेश्वरांनी "कायक वे कैलास" हा सिद्धांत मांडला आहे.बाह्यजग विसरून एकाग्रतेने,निष्ठेने,सर्व शक्ती एकवटून समर्पित भावनेने केलेले कार्य म्हणजे 'कायक' होय. 'कैलास' म्हणजे शाश्वत आनंद होत. कार्लाईलने 'कार्य हिच पूजा'(work is worship)असे म्हटले तर शरणांनी कायकाला कैलास(work is heaven)मानले होते.

ISSN-2278-5655
AMIERJ
AARHAT MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL EDUCATION RESEARCH JOURNAL
Volume–X, Issues– II Jan –Feb 2021

"कायक कारण्यावेळी गुंतल्यावेळी गुरुदर्शनही विसरावे,
लिंगपूजाही विसरावी, जंगम समोर आला तरी पर्वा नको ,
कारण कायकच कैलास असल्या कारणे ,
अमरेश्वर लिंग सुद्धा कायकातच सामावलेले आहे"१
अशा पद्धतीने संत महात्मा महात्मा बसवेश्वरांनी कार्याचे महत्त्व विशद केले आहे.

निवृत्तीवादाला विरोध:

निवृत्तीचा मार्ग स्वीकारून श्रमा पासून पलायन करणे हे बसवेश्वरांना मान्य नव्हते.प्रत्येकाने उपजीविकेसाठी कायक केले पाहिजे. असा दंडक होता घातला होता .अनुभव मंटपामध्ये कारणाशिवाय प्रवेश नव्हता. काश्मीरचा राजा सुद्धा मोळी विकून आपला उदरनिर्वाह चालवत होता. समाजामध्ये ऐतखाऊ वृत्ती नसावी कोणीही कष्ट न करता धनाची किंवा पैशाची अपेक्षा करू नये असे महात्मा बसवेश्वर यांना अपेक्षित होते.

धनसंग्रह, परधन व भ्रष्टाचाराला विरोध:

आज आज समाजापुढे अनेक आर्थिक प्रश्न आहेत.गरीब व श्रीमंत यांच्यातील दरी वाढत आहे.बसवेश्वरांच्या काळाचा विचार करता या समस्या त्या वेळीही होत्या. म्हणून महात्मा बसवेश्वरांनी आवश्यकतेपेक्षा अधिक मालमत्ता जवळ बाळगणे म्हणजे चोरी करण्यासारखे आहे असे म्हणतात.एका वचनात ते म्हणतात,

"करू नका धनसंग्रह,
केल्यास नाही चुकणार येणारे भव"२

म्हणजे भ्रष्टाचाराच्या माध्यमातून परधन ते व्यक्तीचे असो वा समाजाचे लुटून धनसंग्रह करण्याचा प्रयत्न केला तर हा काळा पैसा तुम्हाला झोप लागू देणार नाही .त्या मागून दुःख लागणार आहे. याची जाणीव ठेवा असा संदेश महात्मा बसवेश्वर यांनी दिला आहे. दुसऱ्या एका वचनात महात्मा बसवेश्वर म्हणतात,

"आयुष्य आहे, मृत्यू नाही म्हणून धन गाडून ठेवतात,
आयुष्य संपून मृत्यू येतो, त्या धनाचा उपयोग कोणाला?
जमिनीत गाडू नको, जमीन परत देणार आहे?
डोळ्याने पाहून, भोगल्याविना जाऊ नको,
पत्नीसाठी सोडून जावे म्हटल्यास तिचा विचार वेगळाच असे

ISSN-2278-5655
AMIERJ
AARHAT MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL EDUCATION RESEARCH JOURNAL
Volume–X, Issues– II Jan –Feb 2021

तू गेल्यावर दुसऱ्याच्या हाती देणार नाही का?
दुसऱ्याच्या हाती देऊन ध्येय भ्रष्ट होऊ नको ,
कुडलसंगमदेवाच्या शरणांच्या सेवेत त्वरेने खर्च कर"३

म्हणजेच व्यक्ती धन कमविण्याच्या मागे लागला आहे. स्वतः न वापरता समाजाच्या हितासाठी खर्च न करता धनसंग्रह करण्यावर अधिक भर देतो. तो ती संपत्ती जमिनीत गाडून ठेवतो.जर मृत्यू आला तर जमीन परत देते का? मुलाबाळांसाठी, बायकोसाठी धन सोडल्यास ते ध्येयभ्रष्ट होतील. ती संपत्ती दुसऱ्याच्या हाती जाईल. त्यामुळे तिचा वापर शरणांसाठी, समाजासाठी करण्यास खर्च करण्यास बसवेश्वरांनी सांगितले आहे.

दासोह सिद्धांत:

संत महात्मा बसवेश्वर हे थोर अर्थतज्ञ होते. संपत्ती कशी कमवावे हे त्यांनी कायक सिद्धांत तून सांगितले तर त्या संपत्तीचा वापर कसा करावा हे दासोह सिद्धांतातून सांगितले आहे.या सिद्धांतानुसार प्रामाणिकपणे कायककरून धनसंपत्ती कमवा आणि अतिरिक्त संपत्तीचा विनियोग गुरु,लिंग, जंगम यांच्या सेवेसाठी करा. दासोह हा कन्नड शब्द असून त्याचा अर्थ 'प्रामाणिकपणे मिळविलेल्या मिळकतीचा काही वाटा समाजासाठी,गरजूंसाठी खर्च करणे असा होतो.दासोह हा शब्द दान यासारखा वाटत असला तरी दान आणि दासोह यामध्ये मूलभूत फरक आहे. दासोह म्हणजे देण्यामध्ये कोणत्याही प्रकारचा दात्रभाव नसणे होय. म्हणजे देणाऱ्याच्या मनात 'मी देतो' तर घेणाऱ्यांमध्ये 'मी घेतो' ही भावना नसल्यामुळे परस्पर उपकाराची भावना राहत नाही.

संत महात्मा बसवेश्वरांनी त्रिविध दासोह म्हणजे तीन प्रकारचा दासोह सांगितला आहे. मनुष्याने गुरूला आपले तन, लिंगाला आपले मन व जंगमाला आपले धन अर्पण करणे म्हणजे त्रिविध दासोह होय. त्रिविध दासोहाच्या माध्यमातून ज्ञानप्राप्ती, मानसिक सामर्थ्य व समाजहित या तीन महत्त्वाच्या बाबींची सार्थकता होते.

"भाताचे एक शित पाहता कावळा हाक न मारी का आपुल्या परिवारास?
घासभर अन्न दिसता कोंबडी
न जमवी का आपल्या कुलबांधवास?
शिवभक्त होऊन भक्तीपक्षविहीन असल्यास
तो कावळ्या- कोंबडी हून हीन, कुडलसंगमदेवा"

ISSN-2278-5655
AMIERJ
AARHAT MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL EDUCATION RESEARCH JOURNAL
Volume–X, Issues– II Jan –Feb 2021

तो कावळ्या कोंबडी होऊन हीं कुडलसंगमदेवा"४

महात्मा बसवेश्वर म्हणतात, कावळ्या कोंबड्या सारखे पक्षी सुद्धा आपणास प्राप्त झालेल्या पैकी उपभोगाचा काही भाग आत्मियतेने बोलावून आपल्या नात्यागोत्यातील प्राण्यांना देतात.त्याप्रमाणे संपत्तीचे समाजहितासाठी वितरण केले पाहिजे. यालाच दासोह केला पाहिजे असे म्हटले आहे.

सारांश:

महात्मा बसवेश्वर यांनी आपल्या वचनातून व कार्यातून श्रमप्रतिष्ठेला महत्व प्राप्त करून दिले. कोणतेही काम श्रेष्ठ वा कनिष्ठ नसते ते मनातून समर्पित भावनेने केले पाहिजे.ऐतखाऊ प्रवृत्तीला महात्मा बसवेश्वरांनी विरोध केला. अनुभव मंटपामध्ये प्रवेश देण्यासाठी त्यांनी व्यवसाय करणे हे बंधनकारक ठेवले होते आणि व्यवसाय करत असताना कौशल्य कसे प्राप्त होते आणि काम कसे चांगले होईल याकडे लक्ष दिले होते. धनसंपत्ती संग्रहित करू नका. जेवढी आवश्यक आहे तेवढ्याच धनाचा उपयोग करावा व अतिरिक्त धनाचा उपयोग समाजासाठी करावा हे महात्मा बसवेश्वरांचे तत्व होते. याच तत्त्वावर आधारित प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना आधारित आहे.

संदर्भ:

दोडमनी शालिनी, शरण संदेश, श्रीशैल दोडमनी,अथणी,बेळगाव प्र.आ.नोव्हेंबर पृ. ६३.

दोडमनी शालिनी, उपरोक्त पृ.२६.

दोडमनी शालिनी,उपरोक्त पृ.२६.

कलबुर्गी डॉ.एम.एम.(संपा),वचन,पृ.३८-३९.

बिचेवार स. नि.(२००५), परिवर्तनाचा महामेरू महात्मा बसवेश्वर,पुर्णा:स्वाती प्रकाशन.

मेनकुदळे अ.ग.(२०००), क्रांतीकारी युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वर,भालकी: महाराष्ट्र बसव परिषद.